# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.02.2026** **वार- शनिवार**

---

**टेक-इन-डिफेन्स**

पुणे आंतरराष्ट्रीय केंद्रात परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सहयोगानं सुरु असलेल्या सातव्या आशिया आर्थिक संवादामध्ये आज दुसऱ्या दिवशी तज्ञ वक्त्यांनी संरक्षण तंत्रज्ञान आणि निर्मितीवर चर्चा केली. आजच्या जगामध्ये तंत्रशास्त्रीय सज्जता वैकल्पिक नसून अस्तित्वासाठी अत्यावश्यक असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. 45 पेक्षा जास्त वक्ते जागतिकीकरणाच्या पलिकडील भूअर्थशास्त्रः कर, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक सुसंगतता यावर मंथन करण्यासाठी इथे एकत्र आले आहेत.

**विधी**

वकिली हा व्यवसाय नसून समाजकार्याचं साधन असल्याचं मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा पुणे जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती आरिफ सा. डॉक्टर यांनी आज ओझर इथं व्यक्त केलं. भव्य विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजनांचा महामेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमात न्यायमूर्ती डॉक्टर यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात लाभ देण्यात आले. मान्यवरांनी दालनांना भेट देवून योजनांची माहिती घेतली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत आपआपसातील वाद तडजोडीनं मिटविण्यासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचं १४ मार्चला जिल्ह्यातील प्रत्येक न्यायालयात आयोजन करण्यात येणार आहे, त्याचा लाभ घ्यावा असं आवाहन प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र महाजन यांनी केलं. सिंहगड विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'बालविवाह आणि हुंडाबळी मुक्ती' या विषयावर पथनाट्याचं सादरीकरण केलं.

**ससून**

वैद्यकीय उपचारांसोबतच कायदेशीर तपासाची आवश्यकता असलेल्या 'मेडिको-लीगल केस' रुग्णांची संख्या झपाट्यानं वाढत आहे. परिणामी ससून रुग्णालयाच्या आपत्कालीन सेवा, मनुष्यबळ आणि यंत्रणांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. औंध जिल्हा रुग्णालय, महापालिकेची रुग्णालये येथेही एमएलसी प्रकरणे वर्ग केल्यास पुणे  ससून रुग्णालयावरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे असं  ससून रुग्णालययाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर यल्लपा जाधव यांनी सांगितलं.

**पिंचि मनपा**

मालमत्ता कर ,पाणीपट्टी कर यासह कुठलीही करवाढ न करता सर्वसामान्यांना दिलासा देणारा पिंपरी चिंचवड महापालिकेचा केंद्र, राज्य सरकारच्या पुरस्कृत योजनांसह नऊ हजार ३२२ कोटी १७ लाख रुपयांचा अर्थसंकल्प महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी आज स्थायी समितीसमोर सादर केला. विविध विकास कामांसाठी एक हजार कोटी 186 लाख रुपये तरतूद करण्यात आली आहे. उड्डाणपूल, सांडपाणी प्रकल्प, पाणीपुरवठा यासाठी निधी राखीव ठेवला असून हरित सेतू आणि सुधारासाठी 569 कोटींचं कर्ज आणि रोखे घेतले आहेत. महापौर निधी आणि स्मार्ट सिटीसाठी प्रत्येकी 50 कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे.

**कर**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागामार्फत थकीत मालमत्ताकर वसुलीस गती देण्यासाठी आणि थकीत मालमत्ता कर वसुल होण्याकरीता उद्या १ मार्च पासून विशेष 'अभय योजना' सुरू करण्यात येत आहे. ही योजना ३१ मार्च पर्यंत मर्यादित कालावधीसाठी लागू राहणार आहे.

शहरातील २ लाखांपेक्षा जास्त थकबाकीदारांनी अद्याप थकीत मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही.

**पाणी**

पुणे शहरातील धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा असतानाही अपुऱ्या पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पाणीपुरवठा विभागाला क्षेत्रीय कार्यालयनिहाय बैठका घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. टँकरवरील अवलंबित्व का वाढले, याचाही तपशील मागवण्यात आला आहे.

**झोन**

उत्तर भारतासह अन्य राज्यांत होळीला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असते. त्यामुळे रेल्वेस्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी होते. त्यामध्ये चेंगराचेंगरीसारख्या घटना टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून रेल्वे स्थानकांवर होल्डिंग झोनसह सुरक्षिततेसाठी आरपीएफ कर्मचाऱ्यांची संख्याही वाढवली आहे, अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली. पक्क तिकीट असलेल्या प्रवाशांनाच फलाटावर प्रवेश मिळणार आहे. इतर प्रवाशांना होल्डिंग झोनमध्ये थांबण्याची व्यवस्था करण्यात आली आहे असं पुणे विभागाचे जनसंपर्क अधिकारी हेमंत कुमार बेहेरा यांनी सांगितलं.

**रक्तदाब**

पुणे महापालिकेतर्फे शहरात राबवण्यात येत असलेल्या असंसर्गजन्य आजार प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत गेल्या सात महिन्यांत 75 हजारांहून अधिक नागरिकांमध्ये उच्च रक्तदाबाचा त्रास आढळून आला आहे. शहरात 30 वर्षांवरील सुमारे 17 लाख 89 हजार 159 नागरिक आहेत. त्यापैकी 8 लाख 36 हजार नागरिकांची उच्च रक्तदाबासाठी तपासणी करण्यात आली. बदलती जीवनशैली, शारीरिक हालचालींचा अभाव, ताणतणाव, चुकीच्या आहाराच्या सवयी यामुळं विशेषतः 30 वर्षांवरील वयाच्या लोकांमध्ये उच्च रक्तदाबाचं प्रमाण झपाट्यानं वाढत आहे असं पुणे महापालिकेच्या सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. वैशाली जाधव यांनी सांगितलं.

**म्हाडा**

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळाच्या सदनिकांसाठी अर्जदारांना रहिवासी प्रमाणपत्र सादर करणं बंधनकारक करण्यात आलं आहे. त्यासाठी पंधरा दिवसांची मुदत देण्यात आली आहे. रहिवासी प्रमाणपत्र सादर न करणाऱ्यांना सदनिकेसाठी अर्ज करता येणार नाही अशी माहिती म्हाडा प्रशासनाकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

**नोकरी**

उच्च शिक्षित विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता रोजगार निर्मिती करावी असं मत केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान पार्कचे महासंचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर राजेंद्र जगदाळे यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. नांदे इथं "तंत्रज्ञानातील उदयोन्मुख प्रवाह यावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. डॉक्टर जगदाळे म्हणाले की देशातील प्रत्येक ग्रामीण क्षेत्राचं योग्य नियोजन करण्याची जबाबदारी सुशिक्षित नवयुवकांच्या खांद्यावर आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**